ठाणेकर ज्येष्ठांची देवदर्शनासाठी हवाई सफर

काजुवाडीच्या श्री साईधाम आनंद संस्थेचा उपक्रम

ठाणे: पुढारी वृत्तसेवा

आयुष्याच्या उतारवयात निरस जगण्यातून काही काळाचा विरंगुळा म्हणून ठाण्यातील ज्येष्ठांची अध्यात्मिक भक्तीची इच्छा काजूवाडी येथील श्री साईधाम आनंद संस्थेच्या माध्यमातून पूर्ण केली जाणार आहे. विशेष म्हणजे, प्रभागातील ६५ वर्षांवरील या आजी - आजोबांना थेट विमानाने कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन घडवण्यासाठी नेले जाणार आहे. त्यामुळे ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर या अनोख्या हवाई सफरीतून समाधानाचे क्षण दिसणार आहेत.

ठाणे शहरातील काजूवाडी येथील प्रसिद्ध श्री साई पंचपरमेश्वर मंदिराचा १७ वा वार्षिक जत्रौत्सव नुकताच पार पडला. माजी महापौर तसेच श्री साईधाम आनंद संस्थेचे अध्यक्ष अशोक बारकू वैती यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले होते. ज्येष्ठ नागरिकांना विशेष विमानाने देवदर्शनही घडवले जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते फॉर्म प्रदान

अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उपक्रमाचे फॉर्म पहिल्या पाच ज्येष्ठांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रदान करून या स्तुत्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी महापौर अशोक वैती यांच्यासह एकनाथ जंगम, मुस्ताक खोखर, पांडुरंग दाभेकर, सुरेश कदम, ओंकार देशमुख, संजय जाधव, रजनी कोचरेकर यांच्या उपस्थितीत फॉर्म वाटप करण्यात आले. उपक्रमाचे फॉर्म काजूवाडी येथील सिद्धिविनायक चौकात असलेल्या साई बाबा मंदिराशेजारील माजी महापौर अशोक वैती यांच्या जनसंपर्क कार्यालयातून उपलब्ध होणार आहेत.

संक्षिप्त

मिरा-भाईंदरच्या विद्यार्थ्यांचा सन्मान

भाईंदर : राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ४.० व अर्थ आठवडा अंतर्गत २८ एप्रिल रोजी मिरा-भाईंदर महापालिकेने आयुक्त दिलीप ढोले यांच्या उपस्थितीत शुक्रवारी अर्थ आठवड्याची सांगता करीत याअनुषंगाने पालिकेकडून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेणाऱ्यांना आयुक्तांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. काही वर्षांत वातावरणात गंभीर बदल होत असल्याने त्याला रोखण्यासाठी तसेच पृथ्वीचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यभर २२ ते २८ एप्रिल दरम्यान अर्थ आठवडा साजरा करण्यात आला. याअनुषंगाने मिरा-भाईंदर महापालिकेने शहरात २२ ते २८ एप्रिल दरम्यानच्या अर्थ आठवडा अंतर्गत विविध उपक्रम राबवून लोकांमध्ये जनजागृती केली. त्यात २२ एप्रिल रोजी पथनाट्य, २३ एप्रिल रोजी शहरातील विविध गृहसंकुलांमध्ये जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन केले. २४ एप्रिल रोजी अर्थ आठवडा लोगोचे अनावरण व माझी वसुंधरेची हरित शपथ शहरातील लोकांसह पालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आली. २५ एप्रिल रोजी शहरातील विविध ठिकाणी पथनाट्य तर २६ एप्रिल रोजी पालिका मुख्य कार्यालयापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) दरम्यान प्रभात फेरी काढण्यात आली. या अर्थ आठवड्यात सहभाग नोंदवता यावा, याकरीता शालेय स्तरावर ऑनलाईन तसेच गृहनिर्माण संस्था स्तरावर स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पालिकेकडून पंचमहाभुतांच्या संवर्धनासाठी शहरातील नागरीकांमध्ये विविध उपक्रमांतर्गत जनजागृती केली जात असून यंदाचा अर्थ आठवडा साजरा करताना शहरातील नागरीकांना यामध्ये सहभाग नोंदवता यावा, यासाठी सेल्फी विथ ट्री व किचन गार्डन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशंसनीय सेवेबद्दल कारागृह कर्मचारी अधिकारी यांचा गौरव समारंभ

ठाणे : राज्यातील कारागृहातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या प्रशंसनीय सेवेबद्दल त्यांना सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन त्यांच्या उत्कृष्ठ सेवेबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यासाठी अमिताभ गुप्ता अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधार सेवा यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत समिती गठीत केली. या समितीने सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रकासाठी निवड केलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मध्ये ठाणे मध्यवर्ती कारागृहात कार्यरत तुरुंग अधिकारी श्रेणी-१ मधील दोन , तुरुंग अधिकारी श्रेणी-२ मध्ये दोन आणि कारागृह शिपाई अशा सहा जणांची निवड करण्यात आलेली आहे. राज्यातील कारागृह अधिकारी आणि कर्मचारी यांच्या प्रशंसनीय कामगिरीचा यथोचित सत्कार व्हावा म्हणून २६ एप्रिल,२०२३ रोजी झालेल्या बैठकीत गठीत केलेल्या समितीत स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग, येरवडा पुणे-६, एस.एन. ढमाळ कारागृह उपमहानिरीक्षक आदींचा समावेश होता.

आंदोलकांना भेटण्यास जाणाऱ्या खा. राऊत यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

राजापूर : पुढारी वृत्तसेवा

बारसू सड्यावर आंदोलकांना भेटण्यासाठी चाललेले खासदार विनायक राऊत व सेनेच्या अन्य पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सायंकाळी त्या सर्वांची मुक्तता करण्यात आली.

सकाळी बारसू येथील सड्यावर आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना भेटण्यासाठी शिवसेना सचिव खा. विनायक राऊत हे सेना पदाधिकारी यांच्यासह चालले असता पोलीसान्नी त्यान्ना ताब्यात घेतले होते. खासदार राऊत यांच्या समवेत शिवसेना संपर्कप्रमुख सुधीर मोरे, जिल्हाप्रमुख विलास चाळके, विधानसभा सहसंपर्क प्रमुख चंद्रप्रकाश नकाशे, राजापूर तालुकाप्रमुख कमलाकर कदम, उपतालुकाप्रमुख रामचंद्र उर्फ तात्या सरवणकर, सेना पदाधिकारी विद्याधर पेडणेकर आदी उपस्थीत होते. मुंबई पोलीस अधिनियम ६८ नुसार त्या सर्वान्ना दुपारी साडेबारा वाजता ताब्यात घेण्यात आले होते तर सायंकाळी साडेचारच्या दरम्यान मुंबई अधिनियम ६९नुसार त्या सर्वांची मुक्तता करण्यात आली. राजापूर पोलीस ठाण्याबाहेर शिवसैनिक जमा झाले होते.

विरोधी संघटनेचे विनेश वालम यांना जिल्हाबंदी

गुरुवारी रात्री साडे आठ च्या सुमारास रिफायनरी विरोधी संघटनेचे अध्यक्ष अशोक वालम व त्यांचे चिरंजीव विनेश वालम यांना राजापूर पोलिसानी कलम १४४ चा भंग केला व तालुका बंदीचा आदेश असताना तालुक्यात प्रवेश केल्याप्रकरणी अटक केली होती. त्यांना राजापूर न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यानी वैयक्तिक जामिनावर मुक्तता केली आहे. दरम्यान, त्यांना आता जिल्हाबंदी करण्यात आली असल्याची माहिती राजापूरचे पोलिस निरिक्षक जनार्दन परबकर यांनी दिली आहे .

REQUIRED
(For Navi Mumbai)
Store Keeper
Candidate should be Graduate or Diploma in Material Management, having 7 to 10 years experience in heavy or medium Industrial unit. Knowledge of Purchase Audit, MIS Report, Internal Audit & other store related activites.
Send your resume immediately to :
ashishagarwal1155@gmail.com

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
ई-निविदा सुचना
मुख्य संकेत आणि दूरसंचार अभियंता पात्र आणि अनुभवी कंत्राटदारांकडून पुढील कामासाठी ई-निविदा बोली मागवित आहेत: **"नेरुळ ते रोहा विभाग दरम्यान के.आर.सी.एल. ची जुनी 12 कोर ओएफसी केबल बदलून नवीन 24 कोर ओएफसी केबल टाकणे". (ई-निविदा सूचना क्र: के.आर/सीओ/एसजी/निविदा/01/2022-24 दिनांकित: 29.04.2023). बोलींच्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक:** 30.05.2023 रोजी 16.00 वा. पर्यंत. **कामाचे अंदाजे मूल्य:** ₹ 5.12 करोड़ (जीएसटी वगळता). अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: **www.ireps.gov.in**

पश्चिम रेल्वे
Western Railway
आज़ादी का अमृत महोत्सव | G20 भारत 2023 INDIA

लेव्हल क्रॉसिंग गेट
काळजीपूर्वक ओलांडून जा !

- लेव्हल क्रॉसिंग गेट बंद असताना कधीही रेल्वे ट्रॅक ओलांडण्याचा प्रयत्न करू नका.
- गेटमन असलेले लेव्हल क्रॉसिंग गेट उघडणे, तोडणे किंवा अतिक्रमण करणे हा रेल्वे कायद्याच्या कलम १६० नुसार ३ वर्ष ते ५ वर्षांच्या कारावासासह दंडनीय अपराध आहे.

पश्चिम रेल्वे द्वारे जनहितार्थ जारी
/WesternRly www.wr.indianrailways.gov.in

वनक्षेत्रातील २५ हेक्टर वन अतिक्रमणावर बुलडोझर

बदलापूर वन विभागाकडून आडिवली ढोकळीत कारवाई

नेवाळी : पुढारी वृत्तसेवा

वनविभागाच्या बदलापूर वनक्षेत्रातील आडीवली आणि ढोकळी वनक्षेत्रात २५ हेक्टरवर करण्यात आलेले अतिक्रमण वनविभागाच्या पथकाने नष्ट केल्याची कारवाई करण्यात आली आहे. एका महिन्यापासून सुरु असलेली ही कारवाई अखेर पोलिसांच्या बंदोबस्तात शुक्रवारी संपुष्टात आली. वन विभागाची ग्रामीण भागातील आजवरची सर्वात मोठी कारवाई असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे.

अंबरनाथ तालुक्यातील आडीवली ढोकळी परिसरात वनविभागाचा जमीन आहे. या जमिनीवर आक्रमण करून भूमाफियांनी बंगले आणि घर बांधली होती. वन विभागाकडून वारंवार नोटीसा देऊन सुद्धा अतिक्रमण करणारे भूमाफिया हे अतिक्रमण हटवण्यासाठी तयार होत नव्हते. अखेर शुक्रवारी वन विभागाने पोलिसांच्या मदतीने वन विभागाच्या जमिनीत बांधलेला एक बांगला आणि घर हि जमीनदोबस्त केली आहेत. या कारवाई मध्ये अतिक्रमण केलेल्या भूमाफियांच्ये कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे एका वर्षातील वन विभागाची सर्वात मोठी कारवाई असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे. ग्रामीण भागात वन विभागाच्या जमिनींवर असलेले अतिक्रमण हटवण्याचे काम सध्या वन विभागाकडून सुरु आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात वन विभागाने आडिवली ढोकळी मधील अतिक्रमणांवर परिमंडळ ३ मधील पोलीस यंत्रणा घेऊन हि धडक कारवाई केली आहे. बदलापूर वनपरिक्षेत्र विवेक नातू अधिकारी यांच्या आदेशानुसार आडवली ढोकळी मधील नवीन घरांचे कच्चे पत्ते विटांचे बांधकाम चालू असताना विभागाने धडक कारवाई करत बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.

जाहीर सूचना

या सादरीकरणाद्वारे सर्वांना सूचित करण्यात येत आहे की, मूलतः **श्री. मोहसीन मोंडाल ऊर्फ श्री. मसील मन्नाल** हे फ्लॅट क्र. ८०६, डी विंग, ८ वा मजला, दी तात्या टोपे नगर सीएचएस लि., तात्या टोपे नगर, आरे रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४, क्षेत्र मोजमापित २६९चौ. फूट चटई क्षेत्रफळ, विभिन्न क्र. ८११ ते ८१५ अंतर्गत शेअर प्रमाणपत्र क्र. १६३ धारक या जागेचे कायदेशीर मालक होते जी त्यांना बिल्डर व विकासक मे. ऊर्जा हिंग्ज् प्रा. लि. यांच्याद्वारे ताबापत्र दि. १६.०८.२०१२ अंतर्गत प्राप्त झाले होते, त्यांचे दि. ०९.०९.२०११ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूपश्चात सोसायटीने सदर फ्लॅटमधील सभासदत्व त्यांची पत्नी **श्रीमती जिबान्नीसा मोंडाल** यांच्या नावे केले व **श्रीमती जिबान्नीसा मोंडाल** यांनी आपल्या क्षमतेत सदर फ्लॅट माझे अशील अर्थात **श्री. राजेश सीताराम तलार व श्रीमती मीना राजेश तलार** यांच्या नावे दस्तावेज क्र. बीआरएल-९/३६०९/२०२३ दि. १०.०३.२०२३ अंतर्गत नोंदणीकृत विक्री करार दि. १०.०३.२०२३ अंतर्गत विक्री/हस्तांतरण केले व तेव्हापासून सदर फ्लॅट मालक म्हणून माझ्या अशिलांच्या वापरात, ताब्यात आहे. कोणाही व्यक्तीचा सदर फ्लॅटमध्ये मालकी, गहाण, तारणगहाण, धारणाधिकार, प्रभार, उत्तराधिकार आदी कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क वा हिस्सा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात त्यांचे दावे सहाय्यक दस्तावेजांसमवेत लिखित स्वरूपात सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सादर करावेत अन्यथा अशा व्यक्ती वा व्यक्तींचे असे दावे वा दावा हे अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

सही/- ॲड. यू.पी. चौहान
कार्यालयीन कक्ष क्र. १०, चौहान हाऊस, खारोडी गाव, मार्वे रोड, मुंबई - ४०० ०९५.
मोबाइल नं. - ९७०२२९७३५१ दिनांक : २९.०४.२०२३

वादीतर्फे वकील श्री. ए. एल. पाटील

जाहीर समन्स
(श्रीमती एम. डी. खासनीस)
कोल्हापूर येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीशसो क. स्तर कोल्हापूर यांचे न्यायालयात
नियमित दिवाणी दावा ४३१/२०२२
निशाण नंबर १५/ड

श्रीमती मधुमालती संतोषकुमार तेंडोलकर
रा. २११३/१ ब, सी वॉर्ड, भाऊसिंगजी रोड, शनिवार पेठ, कोल्हापूर ... **वादी**
विरुद्ध
१. श्रीमती प्रतिभा शरद ठाकूर, रा. १२, आलमोना वेस्ट, १३ वा रोड,खार, मुंबई-४०००५२
२. नंदकुमार नित्यानंद तेंडोलकर तर्फे वटमुखत्यार श्रीमती प्रतिभा शरद ठाकूर
रा. रा. १२, आलमोना वेस्ट, १३ वा रोड, खार, मुंबई - ४०००५२
३. सौ. मधुबाला संजय पेटकर, रा. २७६६, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर .... **प्रतिवादी**
४. श्रीमती मीना रघुनाथ तेंडोलकर, रा. २११३/१ ब, सी वॉर्ड, भाऊसिंगजी रोड, शनिवार पेठ, कोल्हापूर
५. सौ. प्राजक्ता पराग गर्गे, रा. २११३/१ ब, सी वॉर्ड, भाऊसिंगजी रोड, शनिवार पेठ, कोल्हापूर
प्रति,
प्रतिवादी नं. १ ते २ यास

ज्याअर्थी वादी सदर राहणार सदर यांनी **प्र. वादी विरुद्ध शहर कोल्हापूर महानगरपालिका येथील मिळकतीसंदर्भात दावा स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट १९६३ कलम ३४ व ३८ प्रमाणे हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी** या न्यायालयात तुमच्या विरुद्ध वाद दाखल केला आहे. त्यासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १७/०७/२०२३** रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ किंवा प्रतिवादी काऊंटर क्लेम ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या दाव्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही बचावाचा किंवा उलट वादाचा सेट ऑफ किंवा प्रतिवादीच्या काऊंटर पुष्ट्यार्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल व अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. म्हणून जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे. आज दिनांक २६/०४/२०२३ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

हुकूमावरून
सही/-
सहा. अधीक्षक
दि. न्यायालय व. स्तर, कोल्हापूर

सही/-
क. लिपिक
सिल

सूचना : १. तुमचे साक्षीदार स्वतः होऊन उपस्थित राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असलेस तर वर न्यायालयाकडे अर्ज केल्यास व आवश्यक तो खर्च भरल्यास कोणत्याही साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयाकडून समन्स मिळू शकेल. २. वादीचे मागणी तुम्हांला मान्य असल्यास, हुकूमनाम्याची बजावणी टाळण्यासाठी तुम्ही वादाची रक्कम खर्चासह न्यायालयात भरावी. हुकूमनाम्याची बजावणी तुमच्यावर किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा दोन्हीवर होऊ शकेल. ३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम नुसार प्रतिवादीने समन्स लागू झालेपासून ३० दिवसांत लेखी कैफियत/म्हणणे दाखल करणे आवश्यक आहे.

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझ्या अशील **श्रीमती मनीषा रवीकुमार चावला**, पत्ता : फ्लॅट क्र. २, तळमजला, शंकर कुटिर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ५४, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ (**"फ्लॅट"**), शंकर कुटिर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (**"सोसायटी"**) च्या सभासद यांच्याकडून त्यांच्या वरील फ्लॅटशी संबंधित दस्तावेजांची पुढील शृंखला गहाळ झाली आहे : १. बिल्डर व श्री. एम. व्ही बालसुब्रणियम यांच्या दरम्यान सन १९६३ मध्ये केलेला करार, २. श्री. एम. व्ही. बालसुब्रमणियम व श्री. डी.आर. वैद्यनाथन यांच्या दरम्यान सन १९७० मध्ये केलेला करार.

माझ्या अशिलांकडून वरील सदर दस्तावेज वरील फ्लॅटमध्ये गहाळ झाले आहेत व त्यांना यासंदर्भात दि. २०.०४.२०२३ रोजी साधारण सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास माहिती झाले. माझ्या अशिलांनी वरील दस्तावेजांचा त्यांच्या फ्लॅटमध्ये शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला परंतु वरील दस्तावेज सापडू शकले नाहीत/गहाळ झाले आहेत व त्यामुळे ते हरवल्याचे समजण्यात येत आहे.

पुढे, माझ्या अशिलांनी वरील संदर्भात सायन पोलीस स्टेशन येथे दि. २७.०४.२०२३ रोजी सूचित केले आहे व त्यासंदर्भात नोंद करण्यात आली असून यासंदर्भातील सायन पोलीस स्टेशनद्वारे जारी गहाळ अहवाल क्र. ३५५४०/२०२३अंतर्गत प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅटशी संबंधित वरील दस्तावेज सापडल्यास त्यांनी ते खालील निर्देशित पत्त्यावर सदर जाहीर सूचना जारी झाल्याच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत परत करावेत. तमाम जनतेच्या माहितीसाठी व विशेषत: वरील फ्लॅटकरिताच्या कोणत्याही इच्छुक खरेदीदाराच्या माहितीसाठी वरील वस्तुस्थितीची नोंद घेण्यासाठी सदर जाहीर सूचना जारी करण्यात येत आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९.०४.२०२३

सही/-
(सागर ए. शहानी)
बी.एलएल, एलएल.बी,, एलएल.एम
वकील, सर्वोच्च न्यायालय
शहानी लॉ चेंबर्स
पत्ता : १/ए, शिव रतन, रस्ता क्र. २, ४५, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.
मोबाइल नं. : ९८२०००८२१०.
ई-मेल : shahanilawchambers@gmail.com

समलिंगी विवाहास मान्यता न देण्यासाठी स्वाक्षरी मोहीम

ठाणे : समलिंगी विवाहास कायदेशीर मान्यता मिळू नये, यासाठी समाजाच्या विविध स्तरातील नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी, तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आली.

ठाणे, कल्याण, डोंबिवली, कर्जत, बदलापूर, अंबरनाथ, भिवंडी, मुलुंड येथे राबविण्यात आलेल्या स्वाक्षरी मोहिमेतील ३१ निवेदनांवर सुमारे ३ हजार ८४६ नागरिकांनी स्वाक्षऱ्या केल्या. समलिंगी विवाहास मान्यता देण्याआधी व्यक्ती, संस्था, समाजातील विविध घटक, तज्ज्ञ यांच्याशी चर्चा करून मगच योग्य ते निर्णय घेण्यात यावा, यासाठी सदर निवेदन देण्यात आली आहे. भारतात विवाहासंस्थेस अतिशय महत्व आहे. भारतीय संस्कृती, सभ्यतेवर पूर्वीपासून अनेक आक्रमणे होऊनही ती चिरंतन टिकून राहण्यामागे भक्कम विवाहसंस्था हे एक महत्त्वाचे कारण आहे.

राजारामबापू सहकारी बँक लि.; पेठ (शेड्युल्ड बँक)
वसुली विभाग, प्रधान कार्यालय, पेठ. ता. वाळवा, जि. सांगली. पिन कोड ४१५४०७.
फोन नं. ०२३४२-२५२१३१,२५२१३३
ई-मेल recovery@rajarambapubank.org

स्थावर मालमत्ता विक्रीची जाहीर नोटीस

बँकेची मालकी हक्क असणारी खालील तपशीलातील स्थावर मालमत्ता विक्री करणेची आहे.

स्थावर मालमत्तेचा तपशील

जिल्हा मुंबई ता. कुर्ला. कुर्ला अंधेरी रोड, मौजे मोहीली येथील उपजिल्हा निबंधक कुर्ला. यांचे अधिकार क्षेत्रातील म्युनिसिपल कॉर्पोरेशन ग्रेटर मुंबई यांचे हद्दीतील सर्व्हे नं. ६३८/३ व सर्व्हे नं. ४६ हिस्सा क्र. २(भाग), सर्व्हे नं.६२ हिस्सा नं. ७(भाग), सर्व्हे नं.४६ हिस्सा नं. ५ ई आणि सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १(भाग) याचे बिगर शेती झालेली जमीन क्षेत्र ३४५५.७ चौ. मी. यावर उभारण्यात आलेल्या "दि बिझनेस बे" या कमर्शियल बिल्डींग मधील खालील प्रमाणे युनिट

१) दुसऱ्या मजल्यावरील कमर्शियल युनिट नं. ३ याचे क्षेत्र ५०१२ चौ.फुट (कारपेट)
२) चौथ्या मजल्यावरील कमर्शियल युनिट नं. ३ याचे क्षेत्र ५०१२ चौ.फुट (कारपेट)

तरी इच्छुक खरेदीदारांनी खरेदी प्रस्ताव dadar@rajarambapubank.org व recovery@rajarambapubank.org या मेल आयडी वरती पाठवावा. संपर्कसाठी मोबाईल नं. ९५६१०००८३० व ९८६०६००९०१

चेअरमन
राजारामबापू सह. बँक लि., पेठ (शेड्युल्ड बँक)
ता. वाळवा जि. सांगली

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24–परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: डोंबिवली

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

वित्तीय संपदांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्निर्मिती आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी अधिनियम, 2022 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा प्राधिकृत अधिकारी **'जिथे आहे तिथे तत्त्वावर' आणि 'जे आहे ते अटीवर' 'जाहीर ई–लिलाव'** मार्गाने देय रकमांची आणि त्यांवरील त्यापुढील व्याजांची, शुल्कांची आणि खर्चांची इ. वसुली करण्यासाठी पुढील मालमत्तेचा ई–लिलाव करत आहे.

कर्जदार आणि सह–कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 26.04.2023 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. नदीम अख्तर 2. नफीस नईम अख्तर शेख	मालमत्तेचा पत्ता : मालमत्तेचा फ्लॅट क्र. एफ–702 अधिमापन 737 चौ.फू. (68.47 चौ.मी.) (नक्त क्षेत्रफळ) 7वा मजला, इमारतीचे प्रस्तावित नाव पालवा कासा सिएलो, लेकशोअर ग्रीन्स येथे स्थित, स्पेशल टाऊनशीप प्रकल्प, कल्याण शीळफाटा रोड, गाव खोणी अंतेरली, डोंबिवली पूर्व, कल्याण महाराष्ट्र 421204 सीमारेषा पूर्व: मोकळा भूखंड पश्चिम: मोकळा भूखंड उत्तर: मोकळा भूखंड दक्षिण: रस्ता	H1546729012 1035157/H154 67290121035 157L /H1546729012 1035157G	15 मार्च 2023	रु. 4,14,000/–	रु. 9177147.46/–	रु. 41,40,000/–	29.05.2023	05.06.2023

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **03/06/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **05/06/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **06/06/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : प्रशांत पाटील, संपर्क क्र. 9223548807, एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8